# धूर्ताख्यान: भारतीय उपहास काव्य

**प्रा. बाळासाहेब गणपाटील**
विद्यावर्धिनी सभेचे कला वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय धुळे
balasahebganpatil72@gmail.com

हिंदु पुराणें ही अनेक अद्भुत, चमत्कृतिपूर्ण, असंभाव्य कथांनी भरलेली असल्याचें प्रसिद्धच आहे. या कथांचा मूळ हेतु कांहींहीअसला तरी भाविक धार्मिकाशिवाय इतरांना त्या विश्वसनीय वाटणे कठीणच श्रद्धेखेरीज त्या त्यां धर्मानुयायांना या विचित्र गोष्टी पटणार नाहींतहेही उघड आहे. धर्माभिमान बाजूला ठेवून वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून या कथांचा विचार करणाऱ्याला त्यांतील अद्भुतता व अतिशयोक्ति यांचं हसूं येईल ! तर्कनिष्ठेच्या निकषावर या कथांची तपासणी केल्यास त्या त्याज्यच ठरतात. अर्थात् धर्मभावना ही तर्कातीत प्रमाणावर अवलंबून असते हो गोष्ट वेगळी!

अशारीतीनें तटस्थ भूमिकेवरून या पौराणिक कथावाङ्मयांतील अवास्तवता, विसंगतता, अत्युक्तता व तर्कदुष्टता नजरेस पडते. पुराणांतील रम्य काव्य, त्यांतील मनोज्ञ तत्त्वचिंतन, त्यांत दिसणारा इतिहासांश या सर्वांना या विचित्र कथांमुळें गालबोट लागल्यासारखें वाटतें. दंतकथा, परीकथा, लोककथा, अद्भुतकथा, साहसकथा, ऐतिह्यकथा व देवताकथा यांची संमिश्र कथा पुढील पौराणिकांनी महाभारतप्रणित प्रथेवर पाऊल टाकून तयार केली आहे. त्यांतील अवास्तवता काढून टाकण्याचे प्रयत्न पूर्वीपासून होत होते, हे महाभारताच्या व पुराणांच्या प्रचलित भिन्न पाठावृत्त्यांवरून स्पष्ट होते, बदलत्या धार्मिक, नैतिक, सामाजिक कल्पनांप्रमाणे या परंपरागत कथांत अनेकवार बदल करण्यांत आले आहेत असे पुरावे भरपूर उपलब्ध आहेत.

हरिभद्र हा परधर्मी या नात्यानें हिंदु पुरणांतील दोषस्थळे दाखवीत असतां तीन प्रमुख मुद्दे पुढे मांडतोः (१) पुराणें बाहेरून गोंडस आतून अर्थशून्य आशयांनी भरलेली आहेत. (२) त्यांतील कथा तर्काच्या कसोटीवर न टिकणाऱ्या सुवर्णाप्रमाणें नकली आहेत. (३) ज्यांनी आजपर्यंत त्यांचेवर श्रद्धा ठेविली त्यांनी ती टाकून सर्वज्ञ जिनाचा मार्ग अनुसरावा.

अशारीतीनें हरिभद्रानें स्वधर्माचा प्रचार हा हेतु डोळ्यापुढे ठेवून हा उपरोधगर्भ ग्रंथ रचिला असें दिसून येईल. तसेंच, पुराणांनीं जनमनाची किती जबरदस्त पकड घेतली आहे याची त्याला आलेली प्रचीति हिला त्यानें गर्भित मान्यताहि दिली आहे ! याचा अर्थ, या ग्रंथाचा अर्थ पुराणे

आणि त्यांचे प्रवर्तक किंवा दोन्ही वर सोडलेले, ते औपचारिक टिकास्त्र होयअसे धूर्ताख्यानाचे स्वरूप म्हटले जाऊ शकते.

टीका ही तर्कशुद्ध खंडन अथवा गर्भित उपहास (विडंबन) अशा दुहेरी पद्धतीनें करितां येते. दुसरा मार्ग अधिक लोकप्रिय, कारण बहुसंख्य वाचकांना तो आवडतो व समजतो, तार्किकता बुद्धिप्रधान विव्दज्जन- मनावरच परिणाम करिते. म्हणून हरिभद्रानें दुसऱ्या टीकाप्रणालीचा अवलंब केला हे उघड आहे. शिवाय तर्कनिष्ठ हल्ला अनंत उत्तरप्रत्युत्तरांची मालिका निर्माण करीत असल्यामुळे उघड युद्धापेक्षां उपरोधरूपी गमिनी कावा अधिक परिणामकारक ठरणें संभवनीय असते.

**धुर्ताख्यानाचे स्वरूप**

हरिभद्र यांनी न्यायशास्त्रपारंगत असतांही याकाव्यग्रंथातविनोदीपूर्ण उपरोधांचा अवलंबकरून पौराणिक कथेची भांबरी उडवली आहे.त्याकरिता या उपाहासकाव्याला साधे कथानक घेतले आहे. येथे पाच ठक आपले आत्मवृत्त अशारीतीने सांगतात की, तो वृत्तांत जर सुसंगत वाटावा पण त्यात पौराणिक विसंगतीचा स्पष्ट बोध व्हावा, कारण ही चोरांची आत्मवृत्ते महाभारत, रामायणादी पुराणातील अद्भुत कथांचे द्वारे समर्थन केली गेली आहेत. उदाहरणार्थ हत्तीच्या गंडस्थळातून स्रवणाऱ्या मदाच्या नद्या वाहू लागल्या, व त्यात हजारो पशु वाहून गेले. हे महाभारतातील वर्णन खरे असेल तर याच्या आत्मवृत्तांत एक हत्ती तिळाच्या तेलाने निर्माण झालेल्या चिखलात अडकून उपासमारीने मृत्युमुखी पडला.[१] यात अविश्वसनीय असे काय आहे. अशा शेकडो कथा्चे या आत्मवृत्तांचे समर्थन करण्याच्या निमित्ताने हरिभद्राने विडंबन केले असून त्या उपहास पात्र ठरविल्या आहेत.

हरिभद्र हा एक कुशल कथाकार आहे. धुर्ताख्यानांतील चोरांची जीवनचरिचे त्यानें पुराणांत हरघडी आढळणाऱ्या कथानकावर आधारित, अशीच रचिली असल्यामुळे त्यानें खूप करमणूक होते ! मध्ययुगीन कथासुत्रातील प्रमुख आयोजने Motifs त्याने उपयोजिली आहेत. उदा. हत्तीने प्रवाशांचा पाठलाग करणे, प्रवासी तांडयावर चोरांची धाड, यक्षोत्सवानिमित्त जत्रा, किमयेचे वेड इ.

दशवैकालिकावरील भाष्यातहरिभद्राने बऱ्याच विनोदी कथा उल्लेखिल्या आहेत. समराइच्चकहा हा त्याचा प्रचंड कथाग्रंथ तर त्याच्या कथनकौशल्याचा उत्कर्षबिंदूच होय! त्याला रूपककथा, प्रतीकात्मक वर्णने, दृष्टांन्त यांची फार आवड आहे.[२] ( मधुबिंदुदृष्टांन्त, कृपस्थ पांथस्य, दोन रस्त्यांचे अरण्य इ. कथेतून आपणास दिसते.) कथानकांत प्रत्येक धूर्त मेजवानी देण्याचे चुकवण्यासाठी इतरांच्या आत्मवृत्ताचे पुराणकथांनी समर्थन करण्याचा आवेशाने प्रयत्न करितो खंडपाना या स्त्रीधूर्तेच्या वृत्ताचे तर उरलेल्या चौघाधूर्तांनी समर्थन केले आहे.[३] हे समर्थन

म्हणजे 'सैतानाच्या तोंडांत बायबल' असा प्रकार असला,तरी त्यामुळे पौराणिक "आख्यानें" अधिकच हास्यापद ठरली आहेत, हे उघड आहे. कारण, आख्यान म्हटले की, ते गंभीर महत्वपूर्ण कथानक असणार. ग्रंथांतील उपहास व विनोद खोचक व मार्मिक आहे. चोरांच्या तोंडी धार्मिक आख्याने हा वदतो व्याघातच म्हणावयाचा. मूलदेव हा चोर आपण उपाशी व तृषित असल्यामुळे जैन मुनीप्रमाणे 'परीषह' सहन करीत आहोत असे सांगतों. श्रेष्ठीकडून उपडलेल्या रत्नमुद्रिकेला खंडपाना ही दान समजते.[४] कारण त्यामुळे तो व्यापारी निष्काळजी झाला, क्वचितविनोद ग्राम्य पातळीवर गेला आहे खरा, पण कांही अंशी ते संभाव्य होतेंच. तसेच, कांही ठिकाणी आत्मकथांची रचना पुनरुक्तिपूर्ण वाटते हे दोष ग्रंथांत दिसून येतात.

भारतीय साहित्यातील विडंबनाचे स्थान:

भारतीय वाङ्मयांत उपहास नामक वाङ्मयप्रकार प्रायः अभावानेच शोभतो. परंतु प्रत्येक युगांत दिसून येणारे मानवी दोष व उणीवा यांचे विरुद्धसात्त्विक संताप उसळून याविरुद्ध आपली लेखणी उचलणारे उपरोधिक लेखक सर्वत्र थोड्या-फार प्रमाणांत चमकतातच. समाजपुरुषाचे दोष आणि बेतालपणा उघड करून कुचेष्टेनें अथवा उपहासाने ते दोष दुरुस्त करण्याचा प्रयत्न पूर्वी झाला असलाच पाहिजे. उपहास हे कांही वाङ्मयीन प्रकारांचे मूलभूत तत्त्व असल्याचे साहित्यांत दिसून येते आणि ही मूलतत्त्वें भारतीय वाङ्मयांतील कथा, काव्यें व नाट्य यांत मधून मधून दृग्गोचर होतात.

संस्कृतांतील दशकुमारचरित व मृच्छकटिक ह्यांत आपणांस वास्तववादी समाजदर्शन घडते. दंडीनें जातां जातां देव, ब्राह्मण, दुराचारी, ढोंगी, तपस्वी, जैन साधु व बुद्धभिक्षुणी यांच्याविरुद्ध उपहासाचें शस्त्र उगारले आहे.[५] एकंदरींत समाजगत दोष उपरोधिक शैलीनें व्यक्त करण्याचा कल दंडीच्या दशकुमारमध्ये वारंवार दिसून येतो. उपहास हा किती प्रभावी आहे हे प्राचीन वैदिक वाङ्मयावरूनही सिद्ध करतां येते. ऋग्वेदाच्या सातव्या मंडलांत ब्राह्मणांच्या मंत्रपठनाचा उपहास बेडकांच्या ओरडण्याबरोबर तुलना करून केला आहे. असे बरेच उतारे वेदांत व ब्राह्मणांत आढळतात.

विदग्ध संस्कृतांत क्षेमेंद्राचा या बाबतींत विशेष उल्लेख करण्याजोगा आहे. त्याच्या समयपत्रिकेंत तत्कालीन समाजदोषांचा विडंबनात्मक उपहास आढळतो. त्याच्या दर्पदलनांत देवतादिकांच्या उणीवादि उपहासानें स्पष्ट केल्या आहेत, तसेंच, कलाविलास ह्या त्याच्या ग्रंथांत भरपूर उपहासच आढळतो. लुब्ध व्यापारी, नामधारी वैद्य, ढोंगी ज्योतिषी, कुटिल कायस्थ, या सर्वांनाच त्यानें उपरोधाच्या चाबकानें झोडपले आहे.[६]

नाट्यवाङ्मयांत भाण आणि प्रहसन या दोनच प्रकारांत उपहासाचे शस्त्र प्रभावीरीत्या उपयोजिले आहे. शाकुंतलांतील धीवराच्या तोंडी घातलेले श्रोत्रियांचे उपहासपर वाक्य

अपवादवजाच आहे. भाणग्रंथापैकीचतुर्भाणी, पद्मप्राभृतक आणि पादताडीतक हे विशेष उल्लेखनीय असून त्यांत बौद्ध, लाट, सौराष्ट्रिक व मालव यांचा विशेष उपहास आढळतो. प्रहसनांपैकी मत्तविलास यांत एका शैव संन्याशाचा दुराचार उपहासाने वर्णिला असून लटकमेलक, धूर्त समागम इत्यादि प्रहसनांत जैन व बौद्ध भिक्खूचे विडंबन करण्यांत आले आहे. याखेरीज इतस्ततः विखुरलेल्य संस्कृत सुभाषितांतून व्याजस्तुतीचा आश्रय करून उपरोधाची चमक दाखवून देण्यांत आली आहे.

हरिभद्राची प्रकृति व पिंड उपहासप्रधान आहे, हे त्याच्या धूर्ताख्यानावरून स्पष्ट दिसतें. उपहासाचे तंत्र यावर पाश्चात्य वाङ्मयांत स्टोन यानें पॅरडी व कॅनमन यानें सटायर ह्यासंबंधीं जे तंत्रविषयक लेख लिहिले आहेत त्यांतील परिभाषा जरी प्राकृत उपहासकथेला सर्वस्वीं लागू पडणारी नसली तरी हरिभद्राच्या कथा या पॅरडी संज्ञेला पात्र नसून सटायर किंवा उपहास या संज्ञेनेंच ओळखणें योग्य होईल, त्यानें पुराणकथांना उपहासाचा साज चढवितांना विनोद, विडंबन, कुचेष्टा, उपरोध व हास्य यांचा भरपूर उपयोग केला आहे. अद्भुत आणि वास्तव यांचा मनोहर मिलाफ करुन व व्यक्तिरेखा स्पष्ट करून आणि विशेषतः सैतानानें बायबलचा आधार घ्यावा त्याप्रमाणें संभाषणे रचून हरिभद्रानें आपणांपुढें एक विनोदप्रधान उपहासकाव्य ठेविलें आहे.

आपल्या संबोध प्रकरणांत जैन संघांत शिरलेले दोष त्यानें उपहासानें निषेधिले आहेत. त्याप्रमाणे येथे धूर्ताख्यानांतश्रध्दाळू समाजाचा पुराणांतील भाकडकथांवर असणारा अंध धार्मिक विश्वास किती मूर्खपणाचा आहे.[७] याचे विश्लेषण त्यानें या विडंबनकाव्यात केले आहे. आपले उपरोधाचे शस्त्र घेऊन एखाद्या कुशल चिकित्सकाप्रमाणें तो कुशलतेने शस्त्रकर्म करीत जातो. आणि नंतरच त्यावर धर्मतत्वांचा लेप करून तो व्रणविरोपण करितो. त्यांची दृष्टि पक्षपाताची नाहीं. असें तोच आपणाला पुन्हां पुन्हां सांगतो.खऱ्या विडंबकाचे स्थान उपदेशक आणि विदूषक ह्या दोघांच्या नेमकें मधोमध असते.दुसऱ्यांचीशस्त्रे वापरून तो पहिल्याचे कार्य करितो. प्रेम आणि व्देष या दोहोंचेहि साहचर्य त्याला हवें असतें. न्यायबुद्धिआणि विवेचक दृष्टिकोन यांच्या इतकीच चुकांची आणि उणिवांची चीड त्याला लेखणी उचलण्यास लाविते.

हा लेखकभावनेपेक्षा बुद्धीसच अधिक आवाहन करितो. प्रमाणबद्धता व तार्किक विचारसरणी हीं त्याचीं वैशिष्ट्ये होत. एखाद्यातर्ककर्कश व धर्मवेड्या विद्वानाप्रमाणें तो एकदम भडकून जात नाहीं, तर आपल्या मनाची समतोलता ढळू न देतां तर्काचा उपयोग करून प्रतिपक्षास तो नामोहरम करतो. पुराणकथांची हुबेहूब नकल करून तो नव्या गोष्टी निर्माण करितो. व त्यांची परस्पर तुलना केल्यावर पौराणिक दंतकथा आपोआप हास्यास्पद ठरतात. त्याच्या कल्पितकथांना शंकास्पद मानावें तर पुराणकथा यांनाहीअवास्तव मानावे लागते.

हरिभद्राचा एक विशेष म्हणजे मूळ पुराणकथांना धक्का न लावितां म्हणजे त्यांत काडीमात्र फरक न करितां तशाच दुसऱ्या काल्पनिक कथाद्वारां त्यांचे वैयक्तिक मततो सहज पटवितो.

ड्रायडन् म्हणतो त्याप्रमाणें उपहासानें दोष सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. हरिभद्रांचा हेतूहि केवळ परधर्मी कल्पनांचे विडंबन करणें एवढाच नसून तद्द्वारां योग्य दृष्टिकोन समाजाला शिकविणे हा होय. परंतु त्याने प्रत्यक्ष उपदेशकाची भूमिका येथे कोठेंहि घेतली नसून आपल्या ग्रंथाचे स्वरूप धर्मकथेत परिणत होऊं न देतां शुद्ध वाङ्मयीन असेच ठेवले आहे. आठव्या शतकांत धूर्ताख्यानासारखा विशुद्ध वाङ्मयीन उपहासपर ग्रंथ अस्तित्वांत यावा. हे हरिभद्रांच्या विशाल दृष्टिकोनाचे द्योतक आहे. क्षेमेंद्रा- पूर्वी तीन शतके आपले उपहास काव्य लिहूनही तो क्षेमेंद्रापेक्षा अनेक पटींनी कुशल लेखक ठरतो. त्याच्या कथेतील पात्रे पूर्णतया कल्पित नाहींत.मुलदेव हा देवदत गणिकेच्या नादी लागलेला एक वाङ्मयातील  प्रसिद्ध जुगारी, चोर आणि प्रियकर आहे. तसेंच, शश आणि एलाषाढ हे दोघेही वाङ्मयात प्रसिद्ध आहेत.

**संदर्भ ग्रंथ-**

१आचार्य हरिभद्रसूरी- धुर्ताख्यान, पान.३५ भारतीय विद्याभवन मुंबई १९६५
२.आचार्य हरीभद्रसूरी- समरादित्यकथा, पान.८८ भगवानदास प्रकाशन अहमदाबाद १९४२
३.आचार्य हरीभद्रसूरी-  धूर्ताख्यान,पान.१०२ भारतीय विद्याभवन मुंबई १९६५
४.आचार्यहरिभद्रसूरी- धूर्ताख्यान, पान.३० भारती विद्याभवन मुंबई १९६५
५.दंडी-दशकुमारचरित्र,पान ४५ मोतीलाल बनारसीदास नवी दिल्ली १९८०
६.क्षमेंद्र-कलाविलास, पान. १०२ भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन नवी दिल्ली १९७०
७.आचार्य हरिभद्रसूरी -धूर्ताख्यान, पान.३९ भारतीय विद्याभवन मुंबई १९६५